# डॉ. सुहासिनी इर्लेकर यांच्या कवितेतील आई

प्रा.डॉ.बापू जी घोलप
मु.पो. लिंबागणेश ता. जि. बीड ४३११२६
मो. ७५८८०५७६९५

साहित्य आणि समाज यांच्यातील नाते अनन्य साधारण आहे. साहित्यातून सामाजिक, राजकिय, आर्थिक, शैक्षणिक, कौटुंबिक, धार्मिक इ. विचार व्यक्त करुन लेखकांनी समाजाचा विकासच साधला आहे. कौटुंबिक जीवनाशी निगडीत असणरा समाज लेखकांनी आपल्या साहित्यातून चितारला आहे. कुटुंबातील आई-वडील, भाऊ-बहिण, काका-काकी, इ. नात्याविषयी असणारा जिव्हाळा आपल्या लेखनीतून साहित्यकांनी व्यक्त केला आहे.

'आई' सनातन मातृरुपाचेच एक सुंदर व व्यापक असे प्रतिक आहे. भारतीय संस्कृती व परंपरेत आईला अत्यंत आदराचे स्थान दिले जाते. मातृदेवोभव, पितृदेवोभव, आचार्य देवोभव यामध्ये प्रथम स्थान आईला दिले आहे. यापूर्वीच्या कुटुंबपध्दतीत 'आई' ही एक महत्वाची व्यक्ती होती. जननीचे नाते हे मानवाचे सर्वात आद्य नाते आहे.

'आई' ही बाळाची पहिली गुरु असते. आईच्या संस्कारातूनच व्यक्तिचे व्यक्तिमत्व खऱ्या अर्थाने घडते. आई मुलांची सतत सावलीसारखी पाठराखण करत असते. मुलांना दु:ख व संकटाच्या झळा लागू नयेत म्हणून त्यांच्या डोक्यावर सतत प्रेमाची सावली धरत असते. प्रत्येकाच्या आयुष्यातील सर्वात प्रिय व्यक्ती म्हणजे आई ! मनाच्या कोपऱ्यातील सर्वात हळवी बाजू म्हणजे आई.

"आई माझा गुरु आई कल्पतरु

सुखाचा सागरु आई माझी"[१]

असे म्हटले आहे, ते याच अर्थाने होय.

आधुनिक मराठी साहित्यातून 'आई' विषयी अनेकांनी लिहिलेले आहे. कादंबरी, आत्मचरित्र, चरित्र इ.तून आपली आई अनेकांनी चितारली आहे. डॉ.दीपा क्षीरसागर यांनी 'आई मराठी कवितेतील' या दीर्घ ग्रंथात आई विषयीचे संकलन विस्तृतपणे मांडले आहे. मात्र आपणाला इथे 'डॉ.सुहासिनी इर्लेकर यांच्या कवितेतील आई' अनुभवयाची आहे.

'आई ! ती माझी आई' हा डॉ. सुहासिनी इर्लेकर यांचा २००६ ला प्रकाशित झालेला कवितासंग्रह आपणाला श्रीमती जानकीबाई वासुदेवराव मंगळवेढेकर यांचे चरित्र, कथाकाव्य आणि भावस्वरुप सांगून जातो.

'जानकी एक जातक' या पहिल्या विभागात कवयित्री कधीकाळी ऐकलेल्या आईच्या बालपणातील स्मृतींना काव्यरुप देतांना दिसतात.

"खडकी, तुळजापूरच्या पायथ्याशी

विसावलेलं एक गाव चिमुकल

काशेगावला वळसा घालून

अमल पल्याड थांबलेलं,[२]

तुळजापूरच्या पायथ्याशी विसावलेल्या खडकी गावच्या देशमुखाची ही लाडकी लेक वत्सला ! पुरुषी पेहराव, घोडेस्वारी, बेरीज वजाबाकी, गंधर्व नाटकाचा पुरेपूर आस्वाद घेणारी एक अल्लड बालीका कवयित्री इथे चितारतात.

"नका चढवू पोरीला डोक्यावर

पुरुषी वेष काय ! घोडयावरुन रपेट काय !

शेवटी मुलीचच जात ना ?"[३]

अशा म्हणणाऱ्या आया-बाया दिसतात. एकूणच आईचे समृध्द बालपण, लग्न विधी, सासरी जाने या साऱ्या घटना कविता वाचतांना साकार होतात. लग्न होऊन सासरी आलेली सून जानकी घरात आली तेंव्हा ती सासुरवाशीन झाली. तिचे वर्णन करतांना इर्लेकर म्हणतात.

"आंधळ्या सासूची काठी झालीस

पांगळ्या दिराची तैनात केलीस

जावा-नणदांनी किती गांजलं !

निमुटपणे सोसत गेलीस"[४]

सुनेच्या पायगुणाने नारायणरावांच एक उदास घर चैतन्याने मुसमुसले. मात्र आपल्या आईच्या भरल्या संसाराचे चित्रण करत असताना मनात असणारी खंत कवयित्री व्यक्त करताना दिसतात.

"लक्ष्मीच्या पावलांनी आलीस दारी

वंशवेल म्हणून रुजलीस

विसाव्याचे हात अलगद

एकविसाव्यात गुंफून गेलीस !"[५]

'आईच्या आठवणी' या दुसऱ्या विभागात कवयित्री इर्लेकर आपल्या आईने सांगितलेल्या सुखी संसाराच्या आठवणींना उजाळा देतात. आईच्या शालू-पैठणीबरोबच मखमली उत्तरपेटी, चंद्रहार, कर्नाटकी वाक्या, अन्य दागिने आणि वस्त्र प्रावरणे यांच्या कुळकथा, कोणी-कोणी, तेव्हा-केंव्हा, काय-काय दिले यासंबंधीच्या आईच्या मनातील कोरीव आठवणी शब्दबध्द झाल्या आहेत.

"जानकी, तू पैठणी नेसून

सर्वलेणी लेऊन ये बरं माझ्यापूढं

मी तसंच केलं मग

तेव्हा जवळ बसवून

आंजारुन-गोंजारुन म्हणतात कशा

'जानकी' तूच माझ्या घराचं

भाग्य उजळलस

लक्ष्मीच्या पावलांनी आलीस

घर बालगोपाळांनी भरुन गेलं

तुझ्र माझी वंशवेल !"[६]

असे तृप्त जीवन जगलेली आई कवयित्री सुहासिनी इर्लेकर आपल्या कवितेत उभ्या करतात.

'अखेरचं वळण' या तिसऱ्या विभागातील कविता व्याकळून टाकते. 'अखेरचं वळण' या दीर्घ कवितेविषयी डॉ.दीपा क्षीरसागर म्हणतात की, "'अखेरचं वळण' ही कविता म्हणजे कथाकाव्य आहे. वृध्दापकाळ हा असा काळ की, ज्या काळात आईचे जग वेगळे व इतरांचे जग हे वेगळे असते. त्यामुळे आई स्वत:भोवती एक लक्ष्मण रेषा आखून घेऊन त्याच्या परिघातच वावरत असते."[७]

डॉ.सुहासिनी इर्लेकर म्हणतात की, वृध्दापकाळात देवघर हे आईचं विश्व झाले, आणि घरातील माणसांचं जग परक झालं, मुलाच्या लहानपणीच्या जुन्या आठवणीवर आई जगत राहते. तेंव्हाचे दुखने आठवून आई रडते. अशा आठवणी कथन करतांनाच पुढे म्हणतात की, परवाची आपली भेट अखेरची ठरली. म्हणालीस, माझं काही खरं नाही आता सर्वत्र पोखरुन गेलाय देह. रडलीस प्रथमच. असहाय, केविलवाणी. तेंव्हा कवयित्री मनातच पुटपुटतात.

"आई तुझ्या आधी जाणं

म्हणजे तुला दु:ख देणं

म्हणून जगायचं !

पण खरं तर तुझं मरण

माझ्याही मरणांचा प्रारंभक्षण असणारा."[८]

भरल्या अंत:करणाने आईचा निरोप घेतला व गाडीत बसले. आईच्या जीवनाच्या संध्याछायेचे हे अत्यंत सजीव ऱ्हदयस्पर्शी शब्दचित्र 'अखेरचं वळण' या कवितेत दिसते. आई व मुलीच्या नात्यातील एकरुपता, हळुवार भावबंध, कवयित्रीची समरसता, या सर्वाचे अत्यंत संवेदनशीलतेने चरित्रचित्र रेखाटले आहे. वृध्दापकाळाचा एक मन सुन्न करणारा अनुभव ही कविता देऊन अस्वस्थ करते.

'अज्ञात प्रदेशाकडे' या चौथ्या विभागातील कविता मृत्यूनंतरच्या अज्ञात प्रदेशाची ओळख आईला प्रथम केंव्हा झाली ते स्पष्ट करतांना आईच्या आईची मृत्युवार्ता तिला कशी नि केंव्हा कळली ते कवयित्री सांगताना म्हणतात की, आई दारापुढे रांगोळी काढण्यात हरवून गेलेली तेव्हा तिथे आईची बालमैत्रिण येते आणि आईला पाहून चकित होते.

"अजून तू इथे कशी ?

आईला जाऊन दहा दिवस झाले !"[९]

अशी घणाघाती वार्ता ऐकवते. घरात जाऊन मोठया जाऊबाईना विचारते, तेंव्हा बातमी न सांगण्यामागचे रहस्य उलघडते. नाही सांगितलं मुद्दामच. गेलेलं माणूस परत येत नाही ना ? त्यात तू अशी भरलेली बाई आणि आधीच घरात मूल नाही मग कशाला संकट गर्भावर. असे न सांगण्याचे समर्थन केले जाते. मात्र आपल्या ऱ्हदयातील वेदना आई चुलीला पोतरा देता-देता तिलाच सखी समजून ती तिला म्हणते की,

"आई गेली गं माझी सखी

गेली ! माझी आई गेली !"[१०]

असे सांगितले जाते नि मोठया सयासाने आवरलेला हुंदका चुलीजवळ फुटतो. हसायचे, बोलायचे विसरलेल्या एका उदास उंबऱ्यावरचे माप लवंडून आलेल्या आईमुळे कधीकाळी वठलेल्या वृक्षाला चैतन्य पालवी फुटली. आईचे नवनवोन्मेषी मातृत्व सुहासिनीबाई जन्मापासून बघत आल्या. अनुभवत राहिल्या. आईची अनेकानेक रुप त्यांना आठवत राहतात. अशीच एक आठवण सांगतात म्हणतात की, ती होती तोवर पायाखालची जमीन वज्रभूमी होती. स्थैर्य होते. आधार होता. तो निखळला. जिवाच्या आकांताने सुहासिनीबाईंचा शोक उन्मळून आला. लहानपणी जरा रडताच धावत येणारी, समजूत घालणारी आई आता येणार नसते. दिसणारही नसते. ही जाणीव होताच,

"आता माझीच पाउलं निघालेली-

झपाटल्यागत तुझ्या दिशेने

अज्ञात प्रदेशाकडे"[११]

असे कवयित्रींना तीव्रतेने वाटते. आईविना जीवन शून्य होते. सारे काही जिथल्या तिथे पण आई नाही-

"सर्व-सर्वच सर्वत्र असेल असायचे ते ते

मात्र तू नसशील आणि मीही असून नसेन !"[१२]

अशा शब्दात ही श्रध्दांजली कवयित्री अर्पण करतात.

या कविता संग्रहाच्या बाबतीत लिहिलांना डॉ.सुशिला पाटील म्हणतात की,"मानवी अंत:करणात निरंतर खळाळत राहणारा मातृप्रेमाचा झरा या काव्यसंग्रहाच्या शब्दाशब्दातून खळाळताना दिसतो. काव्याचा विषय अंतरीच्या जिव्हाळयाचा आणि सुहासिनीताईंची समर्थ शब्दकळा यांच्यामुळे या ऱ्हदयंगम कविता रसिक ऱ्हदयात कायम विसावतात!"[१३] हे एकूण कविता संग्रहातील कवितेच्या बाबतीत मांडलेले उद्‌गार इथे यथायोग्यच वाटतात.

**संदर्भसूची :**

१) क्षीरसागर दीपा, 'आई मराठी कवितेतील', उन्मेष प्रकाशन, प्रथमावृत्ती, १ ऑगस्ट २०१०, पृष्ठ क्र.१६

२) इर्लेकर सुहासिनी, 'आई ! ती माझी आई', सुविदया प्रकाशन, प्रथमावृत्ती, नोव्हे.- २००६, पृष्ठ क्र.०९

३) तत्रैव, पृष्ठ क्र. ११

४) तत्रैव, पृष्ठ क्र. १७

५) तत्रैव, पृष्ठ क्र. १८

६) तत्रैव, पृष्ठ क्र. २५

७) क्षीरसागर दीपा, 'आई मराठी कवितेतील', उन्मेष प्रकाशन, प्रथमावृत्ती, १ ऑगस्ट २०१०, पृष्ठ क्र.३१६

८) इर्लेकर सुहासिनी, 'आई ! ती माझी आई', सुविद्या प्रकाशन, प्रथमावृत्ती, नोव्हे.- २००६, पृष्ठ क्र.३९

९) तत्रैव, पृष्ठ क्र. ४६

१०) तत्रैव, पृष्ठ क्र. ४७

११) तत्रैव, पृष्ठ क्र. ६१

१२) तत्रैव, पृष्ठ क्र. ६२

१३) चिडगोपकर अलका, 'समीक्षा सुहासिनी', पद्‌मगंधा प्रकाशन, प्रथमावृत्ती, १३ जुन २०१२, पृष्ठ क्र.१२१